# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 195/2024 दिनांक : 02.06.2024

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**माळाकोळी :–** दिनांक 28.05.2024 रोजी 07.00 वा. ते 07.30 वा. चे दरम्यान, **मौ. सावरगाव छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या समोर ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद बारा आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस मारहाण करीत असताना यातील साक्षीदार यांनी माझे काकास का मारहाण करत आहात असे विचारले असता यातील नमुद आरोपीतांनी तुम्हाला ग्रामपंचायतच्या सत्तेचा माज आला आहे. असे म्हणुन फिर्यादीस लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी केले व फिर्यादी यांचे काकास काठीने मारहाण करून जखमी करून त्यांच्या खिशातील नगदी 20,000/– रूपये व मोबाईल फोन किमंती 5000/–रूपये, हातातील सोन्याची अंगठी किमंती 15,000/– असा एकुण किमंती 40,000/–रूपयाचा मुददेमाल जबरीने काढुन नेला व गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला तसेच साक्षीदार सोडवण्यास आला असता त्याला पण मारहाण करून गंभीर जखमी करून शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी भारत तुकाराम कदम, वय 36 वर्षे, व्यवसाय शेती रा. सावरगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 124/2024 कलम 307,395,324,323,504,506,143,147,148,149 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मसपोनि/काळे, मो.क्रं. 9922391720** हे करीत

## 2)घरफोडी :–

**नांदेड ग्रामीणः–** दिनांक 28.05.2024 रोजी 22.00 वा. ते दिनांक 01.06.2024 रोजी 07.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घर मिलतनगर देगलुर नाका, नांदेड येथे,** कोणीतरी अज्ञात चोरटयांने घराचे कंम्पाउंड भिंतीवर चढुन छताचा दरवाजा तोडुन बेडरूमचे कुलुप तोडुन आत प्रवेश करून कपाटातील सोन्याचे दागिने किंमती 1,20,000/–रूपये व नगदी 15,000/–रूपये असा एकुण किंमती 1,35,000/–रूपयाचा मुददेमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सयद जावेद अहमद, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. मिल्लतनगर देगलुर नाका, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 452/2024 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास** पोहेकॉ**/648 पांचाळ, मो. नं. 8390006100** हे करीत आहेत.

## 3)चोरी :–

**भाग्यनगर** :– दिनांक 31.05.2024 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **राज कॉर्नर ते चैतन्यनगर कडे जाणारे रोडवर वामनराव पेट्रोलपंप नांदेड येथे,** यातील फिर्यादी यांचे भावास यातील नमुद तीन व इतर 10 ते 15 आरोपीतांनी शिवीगाळ करीत असताना फिर्यादी यांनी त्यांस शिवीगाळ का करता असे विचारले असता यातील आरोपीतांनी तुम्ही आमच्या मुलांना का मारले तुम्ही जातीवाद करता असे म्हणुन फिर्यादीचे तोंडावर बुक्की मारली व स्टील पाईपने डोक्यात मारहाण केली त्यावेळी यातील साक्षीदार सोडविण्यासाठी आले असता त्यांना पण स्टील पाईपने मारहाण केली. सदर मारहाणीमध्ये फिर्यादी यांचे गळयातील सोन्याची चैन किंमती 1,50,000/– रूपयाची यातील तीन इसमा पैकी कोणीतरी एकाने गर्दीचा फायदा घेवुन चोरून नेली. वगैरे **फिर्यादी दिनेश गणपतराव देशमुख, वय 47 वर्षे, व्यवसाय** पेट्रोलपंप **रा. तरोडा बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 226/2024 कलम 379,324,323,506,143,147,149 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पठाण, मो.क्रं. 9970776219** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**उमरी :–**दिनांक 31.05.2024 रोजी 17.30 वा. चे सुमारास, **मौ. गोरठा फिर्यादीचे शेतातील दुकानासमोर ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगनमत करून धुऱ्यावरील कचरा व पाण्याचे पाईप का जाळले या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करून लाकडी काठीने हाताच्या कोपरावर मारून फॅक्चर केले व गंभीर दुखापत केली करून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी गोपाळ दिगांबर सावंत, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. गोरठा ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 169/2024 कलम 326,323,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2018 श्री वडजे, मो. नं. 9765770159** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)देगलुर :–** दिनांक 09.04.2021 ते दिनांक 15.09.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी नांदेड ह.मु. देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस दुकान टाकण्यासाठी माहेरहुन दहा लाख रूपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 225/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2562 पत्रे, मो.क्रं. 9823203404** हे करीत आहेत.

**2)हिमायतनगर :–** दिनांक 09.04.2021 ते दिनांक 15.09.2023 दरम्यान, **फिर्यादीचे सासरी निर्मल राज्य तेलंगना ह.मु. पार्डी ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस ट्रॅक्टर घेण्यासाठी माहेरहुन दोन लाख रूपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 38 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 122/2024 कलम 498(अ),323,504, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1966** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**भोकर :–**दिनांक 01.065.2024 रोजी 07.00 वा. चे सुमारास, **मौ. किन्नी ते कासारपेठ जाणारे रोडवर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्रमांक एमएच–26/बीइ–4534 किंमती 5,00,000/–रूपयाचे मध्ये 12 गोवंश जातीचे जनावरे किंमती 2,23,000/–रू चे स्वतःच्या आर्थीक फादयासाठी दाटीवाटी कोंबुन क्रुरपणे पायास बांधुन कतलीसाठी नेत असतांना एकुण 7,23,000/–रूपयाचे मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2078 बालाजी सोनाजी लक्षटवार, ने. पोस्टे भोकर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 164/2024 कलम 5, 5(अ), 9 सह कलम महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह कलम 11(1)(घ),(ड)(च), प्राणी छळ प्रतिबंधक अधिनियम प्राण्याचे परिवहन नियम सह कलम 66/192 मोटार वाहन अधिनियम कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/राठोड, मो. नं. 8888867833** हे करीत आहेत.

## 7)अवैध रेती चोरी :–

**भोकर :–** दिनांक 01.06.2024 रोजी 00.26 वा. चे दरम्यान, **मौ.बेंबर जिल्हा परीषद शाळा जवळ ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या दोन ब्रास वाळु किंमती 6,000/–रूपयाचे ची चोरी करून टिप्पर एमएच–04/इएल–1489 मध्ये भरून चोरटी विक्री करण्याचे उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1173 श्री सोनाजी जळबाजी कानगुले, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 163/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री देवकांबळे मो.क्रं. 9623979181** हे करीत आहेत.

## 8)फसवणुक :–

**1)उस्माननगर :–** दिनांक 20.07.2023 ते दिनांक 13.07.2023 दरम्यान, **मौ. वाका ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने यातील फिर्यादी व साक्षीदार यांना कर्ज देतो असे म्हणुन प्रत्येकी 32,750/– रूपये प्रमाणे एकुण 2,94,750/– रूपये घेवुन कोणतेही कर्ज न देता पाच हजार रूपये किंमतीचे बनावट बॉन्ड तयार करून फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी जनाबाई पंडित हंबर्डे, व्यवसाय घरकाम रा. वाका ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं. 91/2024 कलम 420,406,465,467,468,471 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गाडेकर, मो.नं. 9823148435** हे करीत आहेत.

**2)नायगाव :–** दिनांक 22.02.2024 ते दिनांक 09.03.2024 दरम्यान, **नायगाव ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपींतानी सगणमत करून यातील फिर्यादी यांना सन 2023 मध्ये T.V.S. कंपनीचे फायनान्स करून दिले होते. त्यानंतर फिर्यादी यांनी ते फायनान्सचे सर्व रक्कम भरले नंतर फिर्यादी यांची परवानगी न घेता त्यांचे माघारी दिनांक 22.02. 2024 ते दिनांक 09.03.2024 रोजी T.V.S. कंपनीचे फायनान्स कडुन परस्पर यातील नमुद आरोपीतांनी स्वतःच्या फायदया साठी फिर्यादी त्यांचे वडिलाचे व मुलांचे कागदपत्राचा दुरूपयोग करून त्यांच्या नावावर एकुण 1,85,999/– रूपये लोन मंजुर करून फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी शाहीनबी रसुलसाब शेख,वय 38 वर्षे व्यवसाय घरकाम रा.बेळगेनगर ता.नायगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं. 122/2024 कलम 420,406,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बनसोडे, मो.नं. 9552509690** हे करीत आहेत.

**3)उमरी :–** दिनांक 06.05.2023 ते दिनांक 05.09.2023 दरम्यान, **मामा चौक उमरी ता. उमरी जि.नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने यांनी यातील फिर्यादी यांना मारूती सुझुकी क्रमांक एमएच–14/एफसी–5201 किंमती 1,77,500/–रूपये व सदर गाडीवर असलेले श्रीराम फायनान्स यांचे असलेल कर्जाचे एकुण 56 हप्ताचे परतफेड करण्याच्या अटीवर 100 रू च्या बॉन्ड पेपर वर विक्री नामा लिहुन घेवुन खरेदी केली. त्यानंतर 29.07.2023 रोजी 1,00000/–रूपये व उर्वरीत 77,500/–रूपये साक्षीदार यांचे समक्ष नगदी स्वरूपात दिले व गाडी घेतल्यानंतर गाडीच्या हप्त्याची परतफेड करण्यासाठी फिर्यादी यांनी यातील आरोपी यांच्या खात्यावर पैसे टाकले परंतु त्यांनी गाडीचे हप्त्याची रक्कम न भरता स्वतःच्या फायदयासाठी खर्च करून गाडी फिर्यादी यांचे नावावर करण्यास टाळाटाळ करून फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी उतम पांडुरंग जाधव, वय 38 वर्षे व्यवसाय मजुरी रा. कुदंळा ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं. 170/2024 कलम 420,406,294,504,506 भादवि कायदा प्रमाणे मा.न्यायालयाचे आदेशाने कलम 156 (3) सीआरपीसी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउनि/श्री चेवले,मो.नं. 8600303335** हे करीत आहेत. .

# 9)अपघात :—

**1)अर्धापुर :—** दिनांक 01.06.2024 रोजी 02.05 वा. चे दरम्यान **मौ. चौरंबा हिंगोली ते नांदेड जाणारे रोडवर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे राम मुगांजी पवार, वय 54 वर्षे, व्यवसाय नौकरी पोहेकॉ ने. पो.स्टे. अर्धापुर रा. परिमल नगर नांदेड** हे बकरी ईद संबधाने गोवंश जातीचे जनावराची अवैध वाहतुकीवर कायदेशीर कारवाई करण्यासाठी मौ. चौरबा येथे नाकाबंदी मध्ये महिंद्रा पिकअप वाहन चेक करीत असताना यातील ट्रक वाहन क्रमाक आरजे—09/सीजी—9945 वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन महिंद्रा पिकअप यास पाठीमागुन जोराची धडक दिली. असता सदर पिकअप समोर असलेले पोलीस कर्मचारी गंभीर जखमी होऊन त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी पोउपनि/बालाजी माधवराव बदलवाड, ने. पोलीस मुख्यालय नांदेड,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं. 271/2024 कलम 279, 304(अ) भादवी सह 184,134,187 मोवा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शेख, मो.नं. 8007851703** हे करीत आहेत.

**2)भोकर :—** दिनांक 31.05.2024 रोजी 18.00 वा. चे दरम्यान, **उमरी चौकात भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे 1) हरीदास बालाजी साडेवाड, वय 32 वर्षे, रा. शास्त्रीनगर ता. भोकर जि. नांदेड 2) राहुल दता वाघमारे वय 36 वर्ष रा. महात्मा फुलेनगर ता. भोकर जि. नांदेड** हे दोघे त्यांचे मोटारसायकल क्रमांक एमएच —26/सीजे—5493 वर बसुन जात असतांना यातील हायवा वाहन क्रमाक एमएच—26/सीजे—5493 वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन मयताचे मोटार सायकलला जोराची धडक दिल्याने मो. सा. वरील दोघेही गंभीर जखमी होऊन त्याचे मरणास कारणीभुत झाला आहे. वगैरे **फिर्यादी बालाजी धोंडोबा सारेवाड वय 47 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शास्त्रीनगर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं. 167/2024 कलम 279, 304(अ) भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री औटे, मो.नं. 9011378018** हे करीत आहेत.

# 10)प्रोव्हिबीशन :—

**1)कुंटुर :—** दिनांक 01.06.2024 रोजी 13.00 वा. चे **सुमारास, मौ. सावरखेड ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी किंमती 3780/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/869 अंगद भानुदास बाऱ्हाळे, ने. पोस्टे कुंटुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटुर** गुरनं 92/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2485 पवार, मो.नं. 9637706877** हे करीत आहेत.

**2)मुदखेड :—** दिनांक 01.06.2024 रोजी 18.55 वा. चे **सुमारास, मौ. चिकाळा तांडा लहान ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 5000/—रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2232 मधुकर व्यंकटराव पवार, ने. पोस्टे मुदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरनं 83/2024 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2721 शिंदे, मो.नं.8669008767** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 196 / 2024 दिनांक : 02.06.2024

## पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड हद्दीमध्ये 7.62 **MM OFD-78-M-80** असे लिहीलेले 436 राऊंन्ड (काडतुस) मिळुन आले.

दिनांक 01.06.2024 रोजी रात्री 20.00 वा. चे सुमारास पोलीस स्टेशन भाग्यनगर नांदेड येथील गुन्हे शोध पथकाचे पोलीस उप निरीक्षक विनोद देशमुख व सोबत पोहेकॉ / गजानन किडे, प्रदिप गर्दनमारे, राठोड, कळके ओप्रकाश कवडे, पोकॉ / हणमंता कदम, कदम असे हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असताना गुप्तबातमीदारा मार्फत माहिति मिळाली की, मौजे पावडेवाडी शिवारातील राहणारा आकाश रामराव पावडे वय 24 वर्षे हा पावडेवाडी शिवारातील नाल्यामधील झाडाझुडपामध्ये मध काढण्यासाठी गेला असता त्याला नाल्यामध्ये रांऊन्ड (काडतुस) दिसुन आले. सदरची माहिति प्राप्त होताच तात्काळ पोलीस निरीक्षक, रामदास शेंडगे, पोस्टे भाग्यनगर व वरील गुन्हे शोधपथकातील अधिकारी व अंमलदार असे सदर ठिकाणी आकाश रामराव पावडे यांचेसह जावून पाहणी केली असता पावडेवाडी शिवारातील नाल्यामध्ये 436 राऊंन्ड (काडतुस) नाल्याच्या मातीमध्ये अर्धवट उघडे पडलेले गंजून जिर्ण झालेल्या अवस्थेत मिळुन आलेले आहेत. सदर राऊंन्ड (काडतुस) ताब्यात घेतले. सदर राऊंन्ड वर पाठमागील फायरकॅप वर 7.62 MM OFD-78-M-80 असे कोरीव लिहीलेले आहे त्याबाबत पोलीस मुख्यालयातील शस्त्रागार शाखेतील अंमलदार यांचे मार्फतीने तपासणी केली असता सदरील राऊंन्ड हे 1978 मध्ये 46 वर्षापुर्वी बनवले असुन ते गंजून जिर्ण होवून निकामी झालेले आहेत असे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. सदरचे राऊंन्ड त्या ठिकाणी कसे आले याबाबत सखोल तपास करणे कामी एक विशेष पथक नेमण्यात आले आहे.

सदर घटनास्थळी **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्री आबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्रीमती किरितीका**, सहा. पोलीस अधिक्षक नांदेड शहर, पोलीस निरीक्षक, रामदास शेंडगे, पोस्टे भाग्यनगर, दहशदवाद विरोधी पथक नांदेड, डॉग स्कॉड नांदेड, बि.डी.डी.एस. पथक नांदेड यांनी भेट देवून पाहणी केली आहे. सदर घटने बाबत अधिक चौकशी पोलीस निरीक्षक, रामदास शेंडगे, पोस्टे भाग्यनगर हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड